# सातारा जिल्हा परिषद

वाचुन :- १.कोषागार कार्यालय सातारा यांचेकडील दि.१८/११/२०१९ रोजीचे आक्षेप
२.महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ९७,९६(१)
३.या कार्यालयाकडील मान्य टिपणी दि.१२/१/२०

जा.क्रं.साप्रवि/आस्था२(२)/अप्र/ ६६०क /२०
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक :- १३/१/२०२०

## आदेश

ज्याअर्थी प्रस्तावनेतील अनुक्रमांक एक अन्वये कोषागार कार्यालय सातारा यांचेकडील दि.१३/१०/२०१७ रोजीचे पत्रानुसार महाराष्ट्र विकास सेवेतील वर्ग १ व २ अधिकारी यांचे एक वर्षावरील प्रवास भत्ते देयकांना विदयमान मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सादर करणेबाबत कळविले आहे.

त्याअर्थी सातारा जिल्हा परिषद अंतर्गत प्रशासकीय कामकाज जलद गतीने होणेसाठी प्रस्तावेतील अनुक्रमांक दोन अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६४ मधील कलम ९७, ९६(१) तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या अधिकाराचा वापर करुन अंतर्गत कार्यरत असणारे वर्ग १ व २ चे अधिकारी यांचे एक वर्षावरील प्रवास भत्ते देयके तसेच वेतन विषयक इतर सर्व भत्ते मंजूरीचे अधिकार उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सातारा यांना देणेत येत आहेत. तसेच यापुर्वी सदर विषयाच्या अनुषंगाने सर्व आदेश या आदेशान्वये अधिक्रमित करणेत येत आहेत.

१.याव्दारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर संबंधित अधिका-यांने त्या विषया संदर्भात निर्गमीत केलेल्या शासन आदेशाच पालन करुन करणेचा आहे.
२.एखादया प्रदान केलेल्या अधिकाराचे संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी हे स्वतः संबंधित अधिका-यांशी सल्लामसलत करुन किंवा स्वतःहून आवश्यक निर्णय घेतील.
३.सदरच्या अधिकाराचा वापर म्हणून अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार तसेच शासनाच्या अन्य अटीस अधिन राहून करणेचा आहे.
४.सदर अधिकार प्रदान आदेशात आवश्यकतेनुसार बदल करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.
५.सदर आदेशाची अंमलबजावणी या आदेशाच्या दिनांकापासून करणेची आहे.

१२/१/२०

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सातारा
मो.नं.९४२२९९३३३३
ई-मेल ceozpsatara@gmail.com

प्रति,

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जिल्हा परिषद सातारा यांना पुढील कार्यवाहीसाठी

प्रत :- जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
प्रत :- सर्व संबंधित खातेप्रमुख, जिल्हा परिषद सातारा यांना कार्यवाहीसाठी

Scanned by CamScanner